# अधिवेशनाच्या तोंडावर राजू परुळेकरांचे टीम अण्णावर टीकास्त्र

नवी दिल्ली.- संसदेच्या हिवाळी अधिवेशनात ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे कठोर लोकपाल विधेयक मंजुरीची मागणी लावून धरणार हे निश्चित असताना अधिवेशनाच्या तोंडावर अण्णांचे ब्लॉगर राहिलेले राजू परुळेकर यांनी टीम अण्णातील चौकडीवर पुन्हा प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. टीम अण्णाचे प्रमुख सदस्य अरविंद केजरीवाल, किरण बेदी आणि प्रशांत भूषण अण्णांचा वापर करून घेत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. परुळेकर यांनी सोमवारी दिल्लीत पत्रकार परिषद घेऊन ब्लॉगसंदर्भात आपण कसे योग्य होतो हे सांगण्याचा प्रयत्न करत असताना अण्णांच्या चौकडीवर तोफ डागली, पण अधिवेशन तोंडावर असताना त्यांनी का पत्रकार परिषद घेतली, यापूर्वी त्यांना असे का वाटले नाही, याबद्दल राजकीय वर्तुळात उलटसुलट चर्चा सुरू आहे.

अण्णांना पक्षीय राजकारणात रस नव्हता. त्यामुळेच ते हिस्सारमध्ये गेले नाहीत आणि तिथे जायचे नव्हते म्हणूनच अण्णांनी मौनव्रत धारण केले, असा खुलासा परुळेकर यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत केला आहे. अण्णांच्या ब्लॉगवरून वादळ निर्माण झाले होते. अण्णांना कोअर समिती बरखास्त करून केजरीवाल, बेदी आणि भूषण यांना त्यातून बाहेर काढायचे होते. या मुद्यावर परुळेकर यांनी आजही ठाम असल्याचे सांगितले. हे चौघेही अण्णांवर प्रचंड दबाव आणतात आणि त्यांचा वापर करून घेतात, या आरोपांचा परुळेकरांनी पुनरुच्चार केला. परुळेकर म्हणाले, आमची संमती घेतल्यानंतरच अण्णांचा ब्लॉग अपडेट करावा, यासाठी ते माझ्यावर दबाव टाकत होते. अण्णा ब्लॉगचा विषय लिहून त्यावर सही करून मला द्यायचे. तो मी भाषांतर करून ब्लॉगवर टाकायचो. अण्णांनी लिहिलेल्या विषयावर या तिघांची संमती कशाला हवी. उपोषणानंतर अण्णांची प्रकृती अजूनही पूर्णपणे सुधारलेली नाही. त्यांच्यावर उपचार करणाऱ्या डॉक्टरांनी त्यांना प्रवास न करण्याचा सल्ला दिला होता. तरीही हे तिघे जण यांना ५ राज्यांच्या दौऱ्यावर नेण्याचा हट्ट करीत होते. स्वत: अण्णा हजारे यांनी टीम अण्णाच्या पुनर्रचनेबाबत लिहून दिले होते. अण्णांना कोअर समिती बरखास्त करून एक पॅन इंडिया संघटना स्थापन करायची होती. त्यातून या तिघांना बाहेर ठेवायचे होते. अण्णांनी तसे स्पष्ट लिहिले होते. परंतु, त्यांचे स्वीय सहाय्यक सुरेश पठारे यांनी मला रोखले. या ब्लॉगसंदर्भात अण्णांनी लिहून दिलेल्या पत्राच्या प्रतीही परुळेकर यांनी पत्रकार परिषदेमध्ये वाटल्या. परुळेकर म्हणाले, अण्णांना उपोषणासाठी या तिघांनीच दबाव आणला. तुम्ही उपोषण केले नाही तर लोकपाल विधेयक मंजूर होणार नाही. असे सांगून ते वारंवार अण्णांना उपोषण करण्यासाठी दबाव आणायचे, असे परुळेकर म्हणाले.